भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६

**(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक २९)**

[२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान]

# The Environment (Protection) Act, 1986

**(Act No. 29 of 1986)**

[*As in force on the 26th February, 2004*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[ **किंमत :** रुपये १३.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि एन्व्हायर्नमेंट (प्रोटेक्शन) ॲक्ट, १९८६, याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर २००४ यात पृष्ठ १४२ ते १५१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Environment (Protection) Act, 1986 as on the 26th February 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No. 2 Vol. 13, dated 14th October 2004 on pages 142 to 151.

This authoritative text was published under the authority of the President Under Section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६

## कलमांचा क्रम

प्रकरण एक

**प्रारंभिक**


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**केंद्र सरकारच्या सर्वसाधारण शक्ती**

३. पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याची केंद्र सरकारची शक्ती.

४. अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या शक्ती व कार्ये.

५. निदेश देण्याची शक्ती.

६. पर्यावरणी प्रदुषणाच्या नियमनाकरिता नियम.

प्रकरण तीन

**पर्यावरणी प्रदूषणांस प्रतिबंध आणि त्यांचा उपशम**

७. उद्योग, कार्यचालन इ. पार पाडणाऱ्या व्यक्तींने मानकांपेक्षा अधिक प्रमाणात पर्यावरणी प्रदुषकांचे उत्सर्जन किंवा निस्सारण न होऊ देणे.

८. जोखमीचे पदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींन कार्यपद्धतीगत संरक्षक तरतुदींचे अनुपालन करणे.

९. विवक्षित प्रकरणांत प्राधिकाऱ्यांना आणि अभिकरणांना अशी माहिती पुरविणे.

१०. प्रवेश करण्याची आणि निरीक्षण करण्याची शक्ती.

११. नमुना घेण्याची शक्ती व त्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती.

१२. पर्यावरण प्रयोगशाळा.

१३. शासकीय विश्लेषक.

१४. शासकीय विश्लेषकांचे अहवाल.

१५. या अधिनियमाचे उपबंध आणि नियम, आदेश आणि निदेश यांच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

१६. कंपन्यांनी केलेले अपराध.

१७. शासकीय विभागांनी केलेले अपराध.

प्रकरण चार

**संकीर्ण**

१८. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१९. अपराधांची दखल.

२०. माहिती, अहवाल व विवरणे.

२१. कलम ३ अन्वये घटित केलेल्या प्राधिकरणाचे सदस्य अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

२२. अधिकारितेस आडकाठी.

२३. प्रत्यायोजनाची शक्ती.

२४. अन्य कायद्यांचा प्रभाव.

२५. नियम करण्याची शक्ती.

२६. या अधिनियमान्वये केलेले नियम संसदेसमोर ठेवणे.

# पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६

## (१९८६ चा अधिनियम क्रमांक २९)

(२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान)

[ २३ मे, १९८६ ]

**पर्यावरणाचे संरक्षण व सुधारण यांकरिता आणि त्याच्याशी निगडित अशा बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथील संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरणासंबंधीच्या ज्या परिषदेमध्ये भारताने भाग घेतला होता त्या परिषदेत, मानवी पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी समुचित उपयोजना करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त निर्णय हे पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा आणि मनुष्यप्राणी, इतर जीवसृष्टी, वनस्पती व संपत्ती यांना पोचणाऱ्या जोखमीस प्रतिबंध करणे यांच्याशी संबंधित आहेत तेथवर ते आणखी कार्यान्वित करणे आवश्यक वाटत आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे भारतीय गणराजाच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :----

### प्रकरण एक

### **प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास " पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ " असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा *दिनांकास तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांकरिता आणि निरनिराळ्या क्षेत्रांकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील [१].

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,---- **व्याख्या.**

(क) " पर्यावरण " या संज्ञेमध्ये, पाणी, हवा व जमीन आणि मनुष्यप्राणी, इतर जीवसृष्टी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपत्ती यांच्यामध्ये आपापसात आणि या दोहोंमध्ये परस्पर असलेला संबंध, यांचा समावेश होतो ;

(ख) " पर्यावरणी प्रदूषक " याचा अर्थ, पर्यावरणास अपायकारक असेल किंवा तसा ठरू शकेल अशा संहतीत विद्यमान असलेला कोणताही घनरूप, द्रवरूप किंवा वायुरूप पदार्थ, असा आहे ;

(ग) " पर्यावरणी प्रदूषण " याचा अर्थ, पर्यावरणात कोणत्याही पर्यावरणी प्रदूषकाचे अस्तित्व असणे, असा आहे ;

(घ) कोणत्याही पदार्थांच्या संबंधात, " हाताळणे " याचा अर्थ, अशा पदार्थांची निर्मिती करणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्याचे संस्करण करणे, त्याची पुडकी बांधणे, साठा करणे, परिवहन करणे, वापर करणे, तो गोळा करणे, त्याचा नाश करणे, त्याचे रूपांतर करणे, तो विक्रीकरिता, हस्तांतरणाकरिता किंवा तत्सम कामाकरता देऊ करणे, असा आहे ;

(ङ) " जोखमीचा पदार्थ " याचा अर्थ, आपल्या रासायनिक किंवा भौतिक-रासायनिक गुणधर्मामुळे किंवा हाताळण्यामुळे माणसांना, इतर जीवनसृष्टीस, वनस्पतींना, सूक्ष्मजीवांना, संपत्तीला किंवा पर्यावरणाला अपाय करू शकतो असा कोणताही पदार्थ किंवा सिद्ध पदार्थ, असा आहे ;

---

* १९ नोव्हेंबर, १९८६.

[१] संपूर्ण भारतामध्ये तो १९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून अंमलात आला. पहा, **भारताचे राजपत्र** क्रमांक ५२५, दिनांक १२ नोव्हेंबर, १९८६ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ११९८ (ई), दिनांक १२ नोव्हेंबर, १९८६.

(च) " भोगवटादार " याचा अर्थ, कोणत्याही कारखान्याच्या किंवा जागेच्या संबंधातील त्या कारखान्याच्या किंवा जागेच्या कारभारावर ज्या व्यक्तीचे नियंत्रण आहे ती व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, कोणत्याही पदार्थांच्या संबंधात, तो पदार्थ कब्जात असणाऱ्या व्यक्तीचा समावेश होता ;

(छ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

प्रकरण दोन

**केंद्र सरकारच्या सर्वसाधारण शक्ती**

**पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याची केंद्र सरकारची शक्ती.**

**३.** (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या आणि त्याचा दर्जा सुधारण्याच्या आणि पर्यावरणी प्रदुषणास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे नियंत्रण करण्याच्या आणि त्या उपशम करण्याच्या प्रयोजनांकरिता आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे सर्व उपाय योजण्याची शक्ती केंद्र सरकारला असेल.

(२) विशेषत: आणि पोटकलम (१) च्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, अशा उपायांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीच्या संबंधातील उपाययोजनांचा समावेश असू शकेल, त्या बाबी अशा :---

(एक) राज्य शासने, अधिकारी आणि----

(क) या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील ; किंवा

(ख) या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी ज्यांचा संबंध जोडता येईल अशा, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही इतर कायद्याखालील,

इतर प्राधिकारी यांच्या कार्याचा समन्वय करणे ;

(दोन) पर्यावरणी प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्याचे नियंत्रण व उपशम यांसाठी एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम आखणे व त्याची अंमलबजावणी करणे ;

(तीन) पर्यावरणाच्या विविध स्वरूपांच्या संबंधात दर्जाविषयक मानके विहित करणे ;

(चार) कोणत्याही विविध साधनांपासून होणाऱ्या पर्यावरणी प्रदूषकांच्या उत्सर्जनासंबंधी किंवा निस्सारणासंबंधी मानके घालून देणे :

परंतु, वेगवेगळ्या साधनांपासून पर्यावरणी प्रदुषकांचे जे उत्सर्जन किंवा निस्सारण होते त्याचा दर्जा व घटकरचना लक्षात घेऊन, या खंडान्वये अशा साधनांकरिता उत्सर्जनाची व निस्सारणाची वेगवेगळी मानके घालून देता येतील ;

(पाच) कोणतेही उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया अथवा उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया यांचे वर्ग जेथे पार पाडता येणार नाहीत किंवा विवक्षित संरक्षण तरतुदींच्या अधीनतेने पार पाडता येतील अशा क्षेत्रांवरील निर्बंध ;

(सहा) ज्या अपघातांमुळे पर्यावरणी प्रदूषण होण्याची शक्यता असेल अशा अपघातांना प्रतिबंध करण्याच्या कार्यपद्धती आणि संरक्षण तरतुदी आणि अशा अपघातांवरील सुधारात्मक उपाययोजना घालून देणे ;

(सात) जोखमीचा पदार्थ हाताळण्याची कार्यपद्धती व संरक्षक तरतुदी विहित करणे ;

(आठ) पर्यावरणी प्रदूषणास कारणीभूत ठरू शकतील अशा निर्मितीप्रक्रिया, सामग्री आणि पदार्थ यांची तपासणी करणे ;

(नऊ) पर्यावरणी प्रदूषणाच्या समस्यांशी संबंधित अन्वेषणे आणि संशोधन करणे आणि त्याचा पुरस्कार करणे ;

(दहा) कोणत्याही जागा, संयंत्र, सामग्री, यंत्रसामग्री, निर्मिती किंवा इतर प्रक्रिया, सामग्री किंवा पदार्थ यांचे निरीक्षण करणे आणि पर्यावरणी प्रदुषणास प्रतिबंध करण्याचे, त्याचे नियंत्रण आणि उपशम करण्याचे उपाय योजण्याकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा प्राधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना किंवा व्यक्तींना असे निदेश आदेशाद्वारे देणे ;

(अकरा) या अधिनियमान्वये, पर्यावरणी प्रयोगशाळांकडे आणि संस्थेकडे सोपवलेली कामे पार पाडण्याकरता अशा पर्यावरणी प्रयोगशाळा व संस्था यांची स्थापना करणे किंवा त्यांना मान्यता देणे ;

(बारा) पर्यावरणी प्रदूषणाशी संबंधित बाबीसंबंधीची माहिती गोळा करणे आणि तिचा प्रसार करणे ;

(तेरा) पर्यावरणी प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्याचे नियंत्रण व उपशम यांच्याशी संबंधित नियमपुस्तिका, संहिता किंवा मार्गदर्शिका तयार करणे ;

(चौदा) या अधिनियमाच्या उपबंधांचे प्रभावी कार्यान्वयन साध्य करण्याच्या प्रयोजनाकरिता केंद्र सरकारला आवश्यक आणि समयोचित वाटतील अशा इतर बाबी.

(३) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता तसे करणे केंद्र सरकारला आवश्यक किंवा समयोचित वाटत असेल तर, त्यास, **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे, या अधिनियमाखालील केंद्र सरकारच्या शक्ती व कार्ये (कलम ५ अन्वये निदेश देण्याची शक्ती धरून) वापरण्याच्या आणि पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता आणि त्या आदेशामध्ये विनिदेश करण्यात येईल त्याप्रमाणे पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या बाबींच्या संबंधात उपाययोजना करण्याकरिता, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने किंवा नावांनी प्राधिकरण किंवा प्राधिकरणे घटित करता येतील, आणि केंद्र सरकारच्या पर्यवेक्षणाच्या आणि नियंत्रणाच्या आणि अशा आदेशाच्या उपबंधाच्या अधीनतेने, जणू काही त्या शक्ती वापरण्याची किंवा ती कार्ये पार पाडण्याची किंवा अशा उपाययोजना करण्याची शक्ती अशा प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणांना या अधिनियमान्वयेच प्रदान करण्यात आली असल्याप्रमाणे अशा प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणांना त्या आदेशांमध्ये निर्देशिलेल्या शक्ती वापरता येतील, किंवा कार्ये पार पाडता येतील किंवा उपाययोजना करता येतील.

**अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या शक्ती व कार्ये.**

**४.** (१) कलम ३, पोटकलम (३) च्या उपबंधांना बाध न आणता, केंद्र सरकार, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, त्याला वाटतील ती पदनामे असलेले अधिकारी नियुक्त करू शकेल आणि या अधिनियमाखाली त्याला योग्य वाटतील अशा शक्ती व कार्ये त्यांच्याकडे सोपवू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेले अधिकारी, केंद्र सरकारच्या किंवा त्या सरकारने तसा निदेश दिला असल्यास कलम ३, पोटकलम (३) अन्वये कोणतेही प्राधिकरण किंवा प्राधिकरणे घटित करण्यात आले किंवा आली असल्यास त्यांच्याही, किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्यांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या आणि निदेशाच्या अधीन असतील.

**निदेश देण्याची शक्ती.**

**५.** कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, केंद्र सरकारला [१], या अधिनियमाखालील आपल्या शक्तींचा वापर करताना आणि आपली कामे पार पाडताना, कोणत्याही व्यक्तीला, अधिकाऱ्याला किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्याला लेखी निदेश देता येतील आणि अशी व्यक्ती, अधिकारी किंवा प्राधिकारी अशा निदेशांचे [२] अनुपालन करण्यास बांधलेली राहील.

---

[१] ह्या अधिनियमाच्या कलम ५ द्वारे केंद्र सरकारकडे विहित असलेल्या शक्ती, केंद्र सरकार, आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, मिझोराम, ओरिसा, राजस्थान, सिक्किम आणि तामिळनाडू या राज्य शासनांना प्रत्यायोजित करील, मात्र सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अशी कृती करणे क्रमप्राप्त असल्याचे केंद्र सरकारचे मत असल्यास, केंद्र सरकारने शक्ती प्रत्यायोजित केलेल्या सर्व किंवा एखाद्या किंवा अधिक राज्य शासनांच्या बाबतीत असे प्रत्यायोजन रद्द करील किंवा या अधिनियमाच्या कलम ५ च्या उपबंधानुसार स्वतः त्यांचा अवलंब करील, अशी शर्त राहील. [ **राजपत्र क्रमांक ५४, दिनांक १० फेब्रुवारी, १९८८ यात प्रसिद्ध झालेली** त्याच दिनांकाची अधिसूचना क्रमांक एस.ओ. १५२ (ई) खालील राज्य शासनांना देखील ह्या शक्ती उपरोक्त शर्तींच्या अधीनतेने प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. मेघालय, पंजाब आणि उत्तर प्रदेश, पाहा. **राजपत्र** क्रमांक २०५, दिनांक १४ एप्रिल १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ३८९ (ई), दिनांक १४ एप्रिल, १९८८, महाराष्ट्र, पहा **राजपत्र** क्रमांक २५५, दिनांक १७ मे १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ४८८ (ई), दिनांक १५ मे, १९९८, गोवा व जम्मू आणि काश्मीर, पहा **राजपत्र** क्रमांक ७४९, दिनांक २२ सप्टेंबर १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ८८१ (ई), दिनांक २२ सप्टेंबर १९८८.

पश्चिम बंगाल, मणीपूर, पहा. **राजपत्र** क्रमांक ३१९, दिनांक ६ जून १९८९ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ४०८ (ई), दिनांक ६ जून १९८९, त्रिपूरा, पहा. **राजपत्र** क्रमांक ४१४, दिनांक २५ जुले १९९१ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस.ओ. ७९ (ई), दिनांक २५ जुलै १९९१.

[२] निर्देश देण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ४ पहा.

**स्पष्टीकरण.**----संशय निवारणासाठी, याद्वारे घोषित करण्यात येते की, या अधिनियमान्वये निदेश देण्याच्या शक्तीमध्ये पुढील निदेश देण्याच्या शक्तीचा समावेश आहे :----

(क) कोणताही उद्योग, कार्यचालन, किंवा प्रक्रिया बंद करणे, त्यास मनाई करणे किंवा त्याचे नियमन करणे ; किंवा

(ख) विजेचा किंवा पाण्याचा पुरवठा किंवा कोणतीही इतर सेवा रोखून ठेवणे किंवा तिचे नियमन करणे.

**पर्यावरणी प्रदूषणाच्या नियमनाकरिता नियम.**

६. (१) केंद्र सरकार, कलम ३ मध्ये निदेशिलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीच्या संबंधात, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करू शकेल.

(१) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरता उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :----

(क) विविध क्षेत्रांकरिता आणि प्रयोजनांकरिता हवा, पाणी किंवा माती यांच्या दर्जाची मानके [१] ;

(ख) विविध क्षेत्रांकरिता विविध पर्यावरणी प्रदूषकांच्या (आवाज धरून) संहतीच्या मान्य कमाल मर्यादा ;

(ग) जोखिमीचे पदार्थ हाताळण्याची कार्यपद्धती आणि संरक्षण तरतुदी [२] ;

(घ) विविध क्षेत्रांमध्ये जोखमीचे पदार्थ हाताळण्यास मनाई आणि निर्बंध [३] ;

(ङ) उद्योगांची ठिकाणे आणि प्रक्रिया पार पाडणे आणि कार्यचालन यांस विविध क्षेत्रांत असलेली मनाई आणि निर्बंध [४] ;

(च) ज्या अपघातांमुळे पर्यावरणी प्रदुषण होण्याची शक्यता असेल अशा अपघातांना प्रतिबंध करण्याच्या आणि अशा अपघातांवरील सुधारात्मक उपाययोजनांकरिता उपबंध करण्याच्या कार्य पद्धती आणि संरक्षण तरतुदी [५].

## प्रकरण तीन

## पर्यावरणी प्रदूषणांस प्रतिबंध, नियंत्रण आणि त्यांचा उपशम

**उद्योग, कार्यचालन इ. पार पाडणाऱ्या व्यक्तीने मानकांपेक्षा अधिक प्रमाणात पर्यावरणी प्रदूषकांचे उत्सर्जन किंवा निस्सारण न होऊ देणे.**

७. कोणताही उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया पार पाडणाऱ्या व्यक्तीने, घालून देण्यात येतील अशा मानकांपेक्षा अधिक प्रमाणात कोणत्याही पर्यावरणी प्रदूषकांचे उत्सर्जन किंवा निस्सारण करता कामा नये किंवा त्यास परवानगी देता कामा नये [६].

---

[१] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ३ आणि त्यातील अनुसूची पहा.

(एक) अनुसूची एकामध्ये उद्योगधंदे, प्रक्रिया किंवा अन्य व्यवहार यातून निर्माण होणाऱ्या पर्यावरणी प्रदूषणात्मक उत्सर्जनाच्या किंवा निस्सारणाच्या मानकांची आणि त्यांच्या कमाल अनुज्ञेय संहितीकरणाच्या मर्यादाची यादी देण्यात आली आहे.

(दोन) अनुसूची दोन मध्ये उत्सर्जित पदार्थांच्या सर्वसाधारण मानकांची व त्याच्या संहितीकरणाच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांची यादी दिलेली आहे.

(तीन) अनुसूची तीन मध्ये भोवतालच्या हवेच्या दर्जाची ध्वनी प्रदुषणांच्या संदर्भातील मानके आणि त्याच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांची यादी दिलेली आहे.

(चार) अनुसूची चार मध्ये मोटार वाहनांपासून निघणारा धूर व बाष्प यांच्या उत्सर्जनाची मानके आणि त्यांच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांची यादी दिलेली आहे :

[२] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम, १३ आणि

(एक) धोकादायक टाकाऊ वस्तू (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९८९ ;

(दोन) धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण व आयात नियम; १९८९ ; आणि

(तीन) धोकादायक मायक्रोऑरगॅनिझम, जेनेटिकली-एन्जिनिअर्ड ऑरगॅनिझम किंवा सेलस् यांची निर्मिती, वापर, आयात, निर्यात व साठवण यांबाबतचे नियम पहा.

[३] सुप्रा, नियम १३.

[४] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ५ पहा.

[५] पहा. पर्यावरण (संरक्षण) नियमातील नियम १२ आणि अनुसूची दोन आणि धोकादायक टाकाऊ वस्तू (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण, व आयात नियम व धोकादायक मायक्रोऑरगॅनिझम, जेनेटिकली-एन्जिनिअर्ड ऑरगॅनिझम किंवा सेलस् यांची निर्मिती, वापर, आयात निर्यात व साठवण यांबाबतचे नियम.

[६] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ३ आणि अनुसूची १ पहा.

८. घालून देण्यात येतील अशा कार्यपद्धतीना अनुसरून आणि अशा संरक्षक तरतुदींचे अनुपालन केल्यावर असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने कोणतेही जोखमीचे पदार्थ हाताळता कामा नये किंवा तसे हाताळले जाण्याची व्यवस्था करता कामा नये [१]. **जोखमीचे पदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींनी कार्यपद्धतीगत संरक्षक तरतुदींचे अनुपालन करणे.**

९. (१) एखाद्या अपघातामुळे किंवा इतर अनपेक्षित कृतीमुळे किंवा घटनेमुळे कोणत्याही पर्यावरण प्रदुषकाचे विहित मानकांपेक्षा अधिक प्रमाणात निस्सारण घडून आले असेल किंवा घडून येण्याची आशंका असेल तेव्हा, अशा निस्सारणास जबाबदार असणारी व्यक्ती आणि ज्या ठिकाणी असे निस्सारण घडून आले किंवा घडून येण्याची आशंका असेल त्या ठिकाणी ताब्यात असणारी व्यक्ती अशा निस्सारणाच्या परिणामी होणाऱ्या पर्यावरणी प्रदुषणास प्रतिबंध करण्यास किंवा ते सौम्य करण्यास बांधलेली राहील, आणि तो विहित करण्यात येतील अशा प्राधिकाऱ्यांना किंवा अभिकरणांना---- **विवक्षित प्रकरणांना प्राधिकाऱ्यांना आणि अधिकारणांना अशी माहिती पुरविणे.**

(क) अशी घटना घडल्याची किंवा घडण्याची आशंका असल्याची वस्तुस्थितीसुद्धा तात्काळ कळवील ; आणि

(ख) तसे फर्मविण्यात आल्यास, सर्व प्रकारे सहाय्य करण्यास बांधलेली राहील [२].

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाची कोणतीही घटना घडल्याची वस्तुस्थिती किंवा तशी आशंका असल्याची माहिती त्या पोटकलमाखालील सूचनेद्वारे किंवा अन्यथा मिळाल्यानंतर, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले प्राधिकारी किंवा अभिकरणे, शक्य होईल तितक्या लवकर, पर्यावरणी प्रदुषणास प्रतिबंध करण्याची किंवा ते सौम्य करण्यासाठी आवश्यक असतील अशा सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी व्यवस्था करतील.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या सुधारात्मक उपाययोजनाच्या संबंधात कोणत्याही प्राधिकाऱ्यास किंवा अभिकरणास काही खर्च करावा लागला असल्यास, तो खर्च, तसेच, खर्चाची मागणी करण्यास आल्यास त्या तारखेपासून तो खर्च चुकता केला जाण्याच्या तारखेपर्यंतचे व्याज (शासन आदेशाद्वारे निश्चित करील अशा, वाजवी दराने) जमीन महसुलाची किंवा शासकीय येणे रकमेची थकबाकी म्हणून, अशा प्राधिकाऱ्यास किंवा अभिकरणास संबंधित व्यक्तीकडून वसूल करता येईल.

१०. (१) या कलमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, केंद्र सरकारने या बाबतीत [३] शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिला आवश्यक वाटेल अशा सहाय्यानिशी, कोणत्याही वाजवी वेळी पुढील प्रयोजनांसाठी कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा हक्क राहील---- **प्रवेश करण्याची आणि निरीक्षण करण्याची शक्ती.**

(क) केंद्र सरकारने तिच्याकडे सोपवलेल्या कामांपैकी काम पार पाडण्यासाठी ;

(ख) अशा कामांपैकी कोणतीही कामे करावयाची असल्यास, ती कोणत्या पद्धतीने करावयाची अथवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या उपबंधाचे किंवा या अधिनियमान्वये बजावलेल्या कोणत्याही नोटिशीचे, काढलेल्या आदेशाचे, दिलेल्या निदेशाचे किंवा मंजूर केलेल्या प्राधिकारपत्राचे अनुपालन करण्यात येत आहे किंवा आलेले आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी ;

(ग) कोणतीही साधनसामग्री, औद्योगिक संयंत्र, अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज किंवा कोणतीही इतर महत्त्वाची वस्तू तपासण्यासाठी किंवा तिची चाचणी घेण्यासाठी किंवा हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम याखालील एखादा अपराध त्याठिकाणी करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे

---

[१] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ नियम १३, आणि

(एक) धोकादायक टाकाऊ (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९८९ ;

(दोन) धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण व आयात नियम, १९८९ ; आणि

(तीन) धोकादायक मायक्रोऑरगॅनिझम, जेनेटिकली-एन्जिनिअर्ड ऑरगॅनिझम किंवा सेलस् यांची निर्मिती, वापर, आयात निर्यात व साठवण नियम पहा.

[२] प्राधिकरणे किंवा अभिकरणे यासाठी पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम १२ आणि अनुसूची दोन पहा.

[३] केंद्र सरकारने (इंग्रजी पृष्ठ २५१) वरील तक्यातील यादी दिलेल्या ६० व्यक्तींना शक्ती प्रदान केलेल्या आहेत ; पहा **भारताचे राजपत्र** क्रमांक ६६, दिनांक १६ फेब्रुवारी, १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ८३ (ई) आणि **भारताचे राजपत्र** क्रमांक ४२, दिनांक १८, जानेवारी १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६३ (ई).

किंवा करण्यात येणार आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही इमारतीची झडती घेण्यासाठी आणि अशी कोणतीही साधनसामग्री, औद्योगिक संयंत्र, अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज किंवा इतर महत्त्वाची वस्तु यामुळे हा अधिनियम किंवा त्याखालील केलेला नियम या अन्वये शिक्षापात्र असलेला एखादा अपराध करण्यात आल्याचा पुरावा मिळू शकेल किंवा पर्यावरणी प्रदुषणास प्रतिबंध करण्यासाठी किंवा ते सौम्य करण्यासाठी असे अभिग्रहण आवश्यक आहे, असे त्यास सकारण वाटत असेल तर, ते अभिग्रहण करण्यासाठी.

(२) कोणताही उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया चालवणारी किंवा कोणतेही जोखमीचे पदार्थ हाताळणारी प्रत्येक व्यक्ती, पोटकलम (१) अन्वये, त्या पोटकलमाखालील कामे पार पाडण्याकरिता, केंद्र सरकारने शक्ती प्रदान केलेल्या व्यक्तीला सर्व सहाय्य देण्यास बांधलेली राहील आणि कोणत्याही वाजवी कारणाशिवाय किंवा सबबीशिवाय तिने तसे करण्यास कसूर केली तर, ती या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(३) जर पोटकलम (१) अन्वये केंद्र सरकारने शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिची कामे पार पाडण्याच्या कामी कोणत्याही व्यक्तीने जाणूनबुजून विलंब लावला किंवा अडथळा केला तर, अशी व्यक्ती या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे उपखंड किंवा काश्मीर राज्याच्या संबंधात किंवा ती संहिता जेथे अंमलात नाही अशा कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, त्या राज्यात किंवा क्षेत्रात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याचे उपबंध हे जसे, उक्त संहितेच्या कलम ९४ अन्वये किंवा, प्रकरणपरत्वे, उक्त कायद्याच्या तत्सम उपबंधान्वये काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेण्यात आलेल्या कोणत्याही झडतीस किंवा केलेल्या अभिग्रहणास लागू होतात, तसे ते या कलमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास, शक्य होईल तितपत, लागू हेतील.

**नमुना घेण्याची शक्ती व त्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**११.** (१) केंद्र सरकारला किंवा त्याने या बाबतीत शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला [१] विहित करण्यात येईल अशा रीतीने विश्लेषणासाठी कोणत्याही कारखान्यातून, जागेतून किंवा इतर ठिकाणाहून तेथील हवेचे, पाण्याचे, मातीचे किंवा इतर पदार्थांचे नमुने घेण्याची शक्ती असेल. [२]

(२) पोटकलम (१) अन्वये घेतलेल्या नमुन्याच्या विश्लेषणाचा निष्कर्ष हा, पोटकलमे (३) आणि (४) यांच्या उपबंधाचे अनुपालन करण्यास आल्याशिवाय, कोणत्याही वैध कार्यवाहीमध्ये पुरावा म्हणून ग्राह्य होणार नाही.

(३) पोटकलम (४) च्या उपबंधाच्या अधीनतेने पोटकलम (१) अन्वये नमुना घेणारी व्यक्ती----

(क) त्याचे अशा प्रकारे विश्लेषण करवून घेण्याचा आपला हेतू असल्याबद्दल भोगवटादारावर किंवा त्याच्या अभिकर्त्यांवर किंवा त्या जागेच्या प्रभारी व्यक्तीवर विहित करण्यात येईन अशा नमुन्यात, तेथल्या तेथे, एक नोटीस बजावील.

(ख) भोगवटादाराच्या किंवा त्यांच्या अभिकर्त्यांच्या किंवा व्यक्तीच्या समक्ष विश्लेषणाकरिता नमुना घेईल.

(ग) नमुना एका वा अनेक पात्रांमध्ये ठेवला जाण्याची व्यवस्था करील व ती पात्रे चिन्हांकित करून मुद्रांकित करण्यात येतील आणि नमुना घेणारी व्यक्ती आणि भोगवटादार किंवा त्यांचा अभिकर्ता किंवा व्यक्ती हे दोघेही त्यावर सह्या करतील.

(घ) ते पात्र किंवा पात्रे विलंब न लावता, कलम १२ अन्वये केंद्र सरकारने स्थापन केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेकडे पाठवील.

[१] केंद्र सरकारने कलम ११ च्या पोटकलम (एक) अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून (इंग्रजी पृष्ठ २५४) वरील तक्त्यातील यादीमधील ६० अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान केलेल्या आहेत ; पहा. **भारताचे राजपत्र** क्रमांक ६६, दिनांक १६ फेब्रुवारी, १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ८४ (ई) आणि **भारताचे राजपत्र** क्रमांक ४२, दिनांक १८ जानेवारी, १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६२ (ई).

[२] नमुना घेण्याविषयीच्या कार्यपद्धतीसाठी पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ च्या नियम ६ देखील पहा.

(४) जेव्हा पोटकलम (१) अन्वये, विश्लेषणासाठी नमुना घेण्यात आला असेल, आणि नमुना घेणाऱ्या व्यक्तीने भोगवटादारावर किंवा त्याच्या अभिकर्त्यावर किंवा व्यक्तीवर पोटकलम (३) च्या खंड (क) अन्वये नोटीस बजावली असेल, तेव्हा----

(क) भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यक्ती जाणूनबुजून गैरहजर राहील अशा प्रकरणी, नमुना घेणारी व्यक्ती विश्लेषणाकरता नमुना घेऊन तो एका वा अनेक पात्रात ठेवील आणि ती पात्रे चिन्हांकित आणि मुद्रांकित करण्यात येतील आणि नमुना घेणारी व्यक्ती त्यावर सहीदेखील करील, आणि

(ख) भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यक्ती नमुना घेण्याच्या वेळेस हजर असेल, परंतु पोटकलम (३) च्या खंड (ग) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे नमुन्यात चिन्हांकित व मुद्रांकित पात्रावर किंवा सही करण्यास त्याने नकार दिला असेल अशा प्रकरणी नमुना घेणारी व्यक्ती चिन्हांकित व मुद्रांकित पात्रावर किंवा पात्रांवर सही करील आणि नमुना घेणारा व्यक्ती विलंब न लावता ते पात्र किंवा पात्रे कलम १२ अन्वये स्थापन केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठवील आणि अशी व्यक्ती कलम १३ अन्वये नियुक्त केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या शासकीय विश्लेषकाला, भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यक्ती जाणूनबुजून गैरहजर राहिल्याबद्दल किंवा [१], प्रकरणपरत्वे, पात्रावर किंवा पात्रांनर सही करण्यास तिने नकार दिल्याबद्दल लेखी कळवील.

**१२.** केंद्र सरकारला, [२] **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,---- **पर्यावरण प्रयोगशाळा.**

(क) एक किंवा अधिक पर्यावरण प्रयोगशाळा स्थापन करता येतील.

(ख) या अधिनियमान्वये एखाद्या पर्यावरणी प्रयोगशाळेकडे सोपवावयाची कामे पार पाडण्यासाठी एक किंवा अधिक प्रयोगशाळांना किंवा संस्थांना पर्यावरणी प्रयोगशाळा म्हणून मान्यता देता येईल. [३]

(२) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील गोष्टी विनिर्दिष्ट करणारे नियम करू शकेल :---

(क) पर्यावरणी प्रयोगशाळेची कार्ये [४] ;

(ख) उक्त प्रयोगशाळेला विश्लेषणासाठी किंवा चाचण्यांसाठी हवेचे, पाण्याचे, मातीचे किंवा इतर पदार्थांचे नमुने सादर करण्याची कार्यपद्धती, प्रयोगशाळेच्या त्यावरील अहवालाचा नमुना आणि अशा अहवालासाठी प्रदेय असलेली फी [५] ;

(ग) त्या प्रयोगशाळेला आपली कामे पार पाडणे शक्य होण्यासाठी आवश्यक व समयोचित असतील अशा इतर बाबी.

**१३.** केंद्र सरकार कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या **शासकीय विश्लेषक.** कोणत्याही पर्यावरण प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठवण्यात आलेल्या हवेच्या, पाण्याच्या, मातीच्या किंवा इतर पदार्थांच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील अशा विहित अर्हता [६] धारण करणाऱ्या व्यक्तींना **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे "शासकीय विश्लेषक" म्हणून नियुक्त करू शकेल किंवा मान्यता देऊ शकेल.

---

[१] केंद्र सरकारने कलम ११ च्या पोटकलम (एक) अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून (इंग्रजी पृष्ठ २५४) वरील तक्त्यातील यादीमधील ६० अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान केलेल्या आहेत ; पहा. **भारताचे राजपत्र** क्रमांक ६६, दिनांक १६ फेब्रुवारी, १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ८४ (ई) आणि **भारताचे राजपत्र** क्रमांक ४२, दिनांक १८ जानेवारी, १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६२ (ई).

[२] केंद्र सरकारने या अधिनियमाच्या कलम १२ याचे पोटकलम (एक) खंड (ख) आणि कलम १३ यांखालील आपल्या शक्ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यायोजित केल्या आहेत. पहा **राजपत्र** क्रमांक १२८, दिनांक २७ फेब्रुवारी १९६९ यामध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश १४५.

[३] पर्यावरण प्रयोगशाळा म्हणून मान्यताप्राप्त प्रयोगशाळा/संस्था व शासकीय विश्लेषक म्हणून मान्यताप्राप्त व्यक्ती यांची यादी इंग्रजी पृष्ठ २२३ वरील तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे.

[४] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ९ पहा.

[५] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ८ पहा.

[६] शासकीय विश्लेषकांच्या अर्हतेसाठी पहा. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम १०.

**शासकीय विश्लेषकांचे अहवाल.**

**१४.** जो दस्तऐवज, शासकीय विश्लेषकाने स्वाक्षरित केलेला अहवाल असल्याचा दिसतो असा कोणताही दस्तऐवज त्यात नमूद केलेल्या तथ्यांचा पुरावा म्हणून या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत वापरता येईल.

**या अधिनियमाचे उपबंध आणि नियम, आदेश आणि निदेश यांच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.**

**१५.** (१) जो कोणी या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा काढलेल्या आदेशांचे किंवा दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर करील किंवा त्यांचे उल्लंघन करील त्यास, अशा प्रत्येक कसुरीबद्दल किंवा उल्लंघनाबद्दल पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील आणि कसूर किंवा उल्लंघन चालू राहिले तर, अशा पहिल्या कसुरीबद्दल किंवा उल्लंघनाबद्दलच्या दोषसिद्धीनंतर अशी कसूर किंवा उल्लंघन चालू राहिल्याच्या प्रत्येक दिवसागणिक पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या जादा द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली कसूर किंवा उल्लंघन दोषसिद्धीपासून एक वर्षाच्या कालावधीनंतरही चालू राहिले तर, अपराध्यास सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

**१६.** (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, अपराध घडला त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाजचालनाबद्दल तिची प्रत्यक्ष प्रभारी होती आणि तिला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनीही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, जर अशा कोणत्याही व्यक्तीने, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये यासाठी आपण शक्य तेवढी वाजवी तत्परता दाखविली होती असे शाबीत केले तर या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने अपराध करण्यात आला होता किंवा त्याने केलेल्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे, असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारीही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यात पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ समाविष्ट आहे, आणि

(ख) " संचालक " याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

**शासकीय विभागांनी केलेला अपराध.**

**१७.** (१) या अधिनियमाखालील अपराध शासनाच्या कोणत्याही विभागाने केलेला असेल तेव्हा विभाग प्रमुख हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल :

परंतु, जर विभाग प्रमुखाने, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये यासाठी आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केले तर, तो कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, या अधिनियमाखालील अपराध शासनाच्या एखाद्या विभागाने केलेला असेल आणि विभाग प्रमुखाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो अपराध करण्यात आला होता किंवा त्याने केलेल्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा अधिकारीही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

## प्रकरण चार

## संकीर्ण

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.**

**१८.** जी गोष्ट या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमानुसार किंवा काढलेले आदेश किंवा निदेश यानुसार सद्‌भावपूर्वक केलेली आहे किंवा करण्याचे उद्देशित आहे अशा कोणत्याही गोष्टीबद्दल शासनाविरूद्ध किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरूद्ध किंवा इतर कर्मचाऱ्याविरूद्ध किंवा या अधिनियमान्वये घटित केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाविरूद्ध किंवा अशा प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरूद्ध किंवा अन्य कर्मचाऱ्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही करता येणार नाही.

**अपराधांची दखल.**

**१९.** (क) केंद्र सरकार किंवा त्या शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी, [१] किंवा

(ख) केंद्र सरकारला किंवा उपरोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला अभिकथित अपराधाविषयी आणि तक्रार करणाऱ्या आपल्या उद्देशाविषयी विहित पद्धतीने कमीत कमी साठ दिवसांची नोटीस देणारी कोणतीही व्यक्ती,

यांनी तक्रार केली असेल त्याखेरीज, कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**माहिती, अहवाल व विवरणे.**

**२०.** या अधिनियमाखालील आपल्या कामांच्या संबंधात केंद्र सरकार कोणत्याही व्यक्तीस, अधिकाऱ्यास, राज्य शासनास किंवा अन्य प्राधिकरणास, स्वतःस किंवा अन्य विहित प्राधिकरणास किंवा, अधिकाऱ्यास कोणतेही अहवाल, विवरणे, आकडेवारी, लेखे आणि अन्य माहिती वेळोवेळी सादर करण्यास फर्मावू शकेल आणि अशी व्यक्ती, अधिकारी, राज्य शासन किंवा अन्य प्राधिकरण असे करण्यास बांधलेली राहील.

**कलम ३ अन्वये घटित केलेल्या प्राधिकरणाचे सदस्य अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.**

**२१.** कलम ३ अन्वये कोणतेही प्राधिकरण घटित केले असल्यास त्या प्राधिकरणाचे सर्व सदस्य आणि अशा प्राधिकरणाचे सर्व अधिकारी व अन्य कर्मचारी हे, ते जेव्हा, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधानुसार आणि त्याखाली केलेल्या नियमांनुसार किंवा काढलेल्या आदेशानुसार किंवा दिलेल्या निदेशांनुसार कारवाई करत असतील किंवा कारवाई करत असल्याचे दिसत असेल तेव्हा ते, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ६) याच्या कलम २१ च्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**अधिकारितेस आडकाठी.**

**२२.** या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीच्या अनुषंगाने किंवा केंद्र सरकारने किंवा कोणत्याही अन्य प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने, त्याच्या किंवा त्यांच्या या अधिनियमाखालील कामाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधात किंवा काढलेला आदेश किंवा दिलेला निदेश यांच्या संबंधात, कोणताही दावा किंवा कार्यवाही विचारार्थ स्वीकारण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयाला असणार नाही.

**प्रत्यायोजनाची शक्ती.**

**२३.** कलम ३ च्या पोटकलम (३) च्या उपबंधास बाध न आणता, केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या आणि मर्यादांच्या अधीनतेने त्याला आवश्यक किंवा समयोचित वाटतील अशा या अधिनियमाखालील त्याच्या शक्ती व कामे [ कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये प्राधिकरण घटित करण्याची शक्ती व कलम २५ अन्वये नियम करण्याची शर्ती खेरीजकरून ] कोणत्याही अधिकाऱ्यास, राज्य शासनास किंवा इतर प्राधिकरणास प्रत्यायोजित करता येतील.

**अन्य कायद्यांचा प्रभाव.**

**२४.** (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, या अधिनियमाचे उपबंध, त्याखाली केलेले नियम किंवा आदेश हे, या अधिनियमाखेरीज अन्य कोणत्याही अधिनियमामध्ये त्यांच्याशी विसंगत असे काहीही असले तरी, अंमलात आणले जातील.

---

[१] केंद्र सरकारने कलम १९ च्या खंड (क्) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून इंग्रजी पृष्ठ २३८ वरील तक्त्यामध्ये यादीत दिलेल्या अधिकाऱ्यांना व प्राधिकरणाला प्राधिकृत केलेले आहे ; पहा **राजपत्र** क्रमांक १८५, दिनांक १६ एप्रिल, १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ३९४ (ई), **राजपत्र** क्रमांक १७१, दिनांक २९ मार्च, १९८९ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश २३७ (ई) आणि **राजपत्र** क्रमांक ५१९, दिनांक २१ ऑगस्ट, १९८९ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६५६ (ई), दिनांक २१ ऑगस्ट, १९८९.

(शा.म.मु.) एच ४१७५—३ (१,०३५—०६-०७)

(२) जेव्हा एखादी कृती किंवा अकृती यामुळे या अधिनियमाखालील तसेच कोणत्याही इतर अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध घडतो, तेव्हा, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळलेला अपराधी, त्या इतर अधिनियमान्वये शिक्षा दिली जाण्यास पात्र होईल ; या अधिनियमान्वये नव्हे.

नियम करण्याची शक्ती.

**२५.** (१) केंद्र सरकार या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :----

(क) कलम ७ अन्वये, ज्या मानकांपेक्षा अधिक प्रमाणात प्रदुषके विसर्जित किंवा उत्सर्जित केली जाता कामा नये, ती मानके [१] ;

(ख) ज्या कार्यपद्धीनुसार आणि ज्या संरक्षक तरतुदींचे अनुपालन करून, कलम ८ अन्वये, जोखमीचे पदार्थ हाताळले जातील किंवा हाताळले जाण्याची व्यवस्था करता येईल ती कार्यपद्धती व त्या संरक्षक तरतुदी [२] ;

(ग) कोणत्याही पर्यावरणी प्रदुषकाचे, विहित मानकांपेक्षा अधिक प्रमाणात उत्सर्जन होत आहे किंवा होत असल्याची आशंका आहे या वस्तुस्थितीची सूचना ज्यांना देण्यात आली पाहिजे तसेच कलम ९ च्या पोटकलम (१) अन्वये ज्याच्यावर सर्व सहाय्य देण्याची बांधिलकी आहे अशी प्राधिकरणे किंवा अभिकरणे [३] ;

(घ) कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये हवा, पाणी, माती किंवा इतर पदार्थ यांचे नमुने विश्लेषणाकरिता ज्या रीतीने घेता येतील ती रीत [४] ;

(ङ) कलम ११ च्या पोटकलम (३) च्या खंड (क) अन्वये नमुन्यांचे विश्लेषण करवून घेण्याच्या हेतूची नोटीस ज्या नमुन्यात बजावण्यात येईल तो नमुना [५] ;

(च) पर्यावरणी प्रयोगशाळेची [६] कार्ये, हवा पाणी, माती आणि इतर पदार्थ यांचे नमुने विश्लेषणाकरिता किंवा चाचणीकरता अशा प्रयोगशाळेकडे सादर करण्याची कार्यपद्धती [७] ; प्रयोगशाळेच्या अहवालाचा नमुना ; अशा अहवालाकरिता द्यावयाची फी आणि अशा प्रयोगशाळेला तिची कलम १२ च्या पोटकलम (२) खालील, कामे पार पाडणे शक्य व्हावे यासंबंधीच्या इतर बाबी ;

(छ) हवा, पाणी, माती किंवा इतर पदार्थांच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्याच्या प्रयोजनाकरता कलम १३ अन्वये नियुक्त करण्यात किंवा मान्यता देण्यात आलेल्या शासकीय विश्लेषकाच्या अर्हता [८] ;

(ज) कलम १९ च्या खंड (ख) अन्वये, अपराधाची नोटीस आणि केंद्र सरकारकडे तक्रार करण्याच्या उद्देशाची नोटीस ज्या रीतीने देण्यात येईल ती रीत [९] ;

(झ) कलम २० अन्वये कोणतेही अहवाल, विवरणे, आकडेवारी, लेखे आणि अन्य माहिती ज्यास पुरविण्यात येईल असे प्राधिकरण किंवा अधिकारी ;

(ञ) जी विहित करणे आवश्यक आहे किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

---

[१] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम १३ आणि,----
(एक) धोकादायक टाकाऊ पदार्थ (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९८९.
(दोन) धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण व आयात नियम, १९८९ आणि
(तीन) धोकादायक मायक्रो-अरिगॅनिझम, जेनेटिकली-एन्जिनिअर्डऑरगॅनिझम किंवा सेलस् यांची निर्मिती, वापर, आयात, निर्यात व साठवण यांबाबतचे नियम पहा.

[२] सुप्रा, नियम १३.

[३] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ३ आणि अनुसूची १ पहा.

[४] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ६ पहा.

[५] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ७ पहा.

[६] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ९ पहा.

[७] प्रयोगशाळेत नमुने पाठवण्याची कार्यपद्धती व प्रयोगशाळेच्या अहवालाचा नमुना यासाठी पहा, पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ८ पहा.

[८] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम १० पहा.

[९] पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ११ पहा.

**या अधिनियमान्वये केलेले नियम संसदेसमोर ठेवणे.**

२६. या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर त्याचे अधिवेशन चालू असताना, दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा बदललेल्या रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

# THE ENVIRONMENT (PROTECTION) ACT, 1986
## पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६
### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abatement | उपशम | [Sec. 3 *(2)* *(ii)*] |
| agency | अभिकरण | [Sec. 9 *(3)*] |
| analysis | विश्लेषण | [Sec. 11 *(2)*] |
| annulment | शून्यीकरण | [Sec. 26] |
| apprehension | आशंका | [Sec. 9 *(1)*] |
| authorisation | प्राधिकारपत्र | [Sec. 10 *(1)* *(b)*] |
| bound | बांधील | [Sec. 25 (2) (c)] |
| civil court | दिवाणी न्यायालय | [Sec. 22] |
| code | संहिता | [Sec. 3 *(2)* *(xiii)*] |
| cognizance | दखल | [Sec. 19 *(b)*] |
| compliance | अनुपालन | [Sec.5 ] |
| composition | घटकरचना | [Sec. 3 *(2)* *(iv)*] |
| concentration | संहति | [Sec. 6 *(2)* *(b)*] |
| connivance | मूकानुमती | [Sec. 16 *(2)*] |
| constituted | घटित | [Sec. 21] |
| contravention | उल्लंघन | [Sec. 15 *(1)*] |
| conviction | दोषसिद्धी | [Sec. 15 *(1)*] |
| delegation | प्रत्यायोजन | [Sec. 23] |
| discharge | (१) विसर्जन | [Sec. 3 *(2)* *(iv)*] |
| | (२) निस्सरण | [Sec. 3 *(2)* *(iv)*] |
| emission | उत्सर्जन | [Sec. 3 *(2)* *(iv)*] |
| expedient | समयोचित | [Sec. 12 *(2)* *(c)*] |
| fact | तथ्य | [Sec. 14] |
| failure | कसूर | [Sec. 15 *(1)*] |
| hazard | जोखीम | [preamable] |
| in charge | प्रभारी | [Sec. 11 *(3)*] |
| in good faith | सद्भावपूर्वक | [Sec. 18] |
| in the presence of | च्या समक्ष | [Sec. 11 *(3)* *(a)*] |
| investigation | अन्वेषण | [Sec. 3 *(2)* *(ix)*] |
| liable | पात्र | [Sec. 17 *(1)*] |
| living creatures | जीवसृष्टी | [Sec. 2 *(a)*] |
| manual | नियमपुस्तिका | [Sec. 3 *(2)* *(xiii)*] |
| marked | चिन्हांकित | [Sec. 11 *(4)* *(b)*] |
| micro-organisms | सूक्ष्मजीव | [Sec. 2 *(a)*] |
| mitigate | सौम्य करणे | [Sec. 9 *(1)*] |
| modification | फेरबदल | [Sec. 26] |
| nation-wide | राष्ट्रव्यापी | [Sec. 3 *(2)* *(ii)*] |
| occupier | भोगवटादार | [Sec. 2 *(f)*] |
| operation | कार्यचालन | [Sec. 3 *(2)* *(v)*] |
| pollutant | प्रदूषक | [Sec. 2 *(b)*] |
| remedial measures | सुधारात्मक उपाययोजना | [Sec. 3 *(2)* *(vi)*] |
| result | निष्कर्ष | [Sec. 11 *(2)*] |
| return | विवरण | [Sec. 20] |

| | | |
|---|---|---|
| safe guards | संरक्षण तरतुदी | [Sec. 3 (*1*) (*vi*)] |
| search | झडती | [Sec. 10 (*1*) (*c*)] |
| seize | अभिग्रहण | [Sec. 10 (*1*) (*c*)] |
| sponsor | पुरस्कार करणे | [Sec. 3 (*2*) (*ix*)] |
| statistics | आकडेवारी | [Sec. 20] |
| successive session | क्रमवर्ती सत्र | [Sec. 26] |
| suit | दावा | [Sec. 22] |
| to prove | शाबीत करणे | [Sec. 16 (*2*) ] |
| to seal | मुद्रांकित करणे | [Sec. 11 (*4*) (*b*)] |
| transportation | परिवहन करणे | [Sec. 2 (*c*) ] |

# पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८३

# ENVIRONMENT (PROTECTION) ACT, 1983

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनुपालन | compliance | [ कलम ५ ] |
| अन्वेषण | investigation | [ कलम ३(२) (नऊ) ] |
| अभिकरण | agency | [ कलम ९ (३) ] |
| अभिग्रहण | seize | [ कलम १० (१) (ग) ] |
| आकडेवारी | statistics | [ कलम २० ] |
| आशंका | apprehension | [ कलम ९ (१) ] |
| उल्लंघन | contravention | [ कलम १५ (१) ] |
| उत्सर्जन | emission | [ कलम ३ (२) (चार) ] |
| उपशम | abatement | [ कलम ३ (२) (दोन) ] |
| कसूर | failure | [ कलम १५ (१) ] |
| कार्यचालन | operation | [ कलम ३ (२) (पाच) ] |
| क्रमवर्ती सत्र | successive session | [ कलम २६ ] |
| घटकरचना | composition | [ कलम ३ (२) (चार) ] |
| घटित | constituted | [ कलम २१ ] |
| चिन्हांकित | marked | [ कलम ११ (४) (ख) ] |
| च्या समक्ष | in the presence of | [ कलम ११ (३) (क) ] |
| जीवसृष्टी | living creatures | [ कलम २ (क) ] |
| जोखीम | hazard | [ उद्देशिका ] |
| झडती | search | [ कलम १० (१) (ग) ] |
| तथ्य | fact | [ कलम १४ ] |
| दखल | cognizance | [ कलम १९ (ख) ] |
| दावा | suit | [ कलम २२ ] |
| दोषसिद्धी | conviction | [ कलम १५ (१) ] |
| दिवाणी न्यायालय | civil court | [ कलम २२ ] |
| नियमपुस्तिका | manual | [ कलम ३ (२) (तेरा) ] |
| निष्कर्ष | result | [ कलम ११ (२) ] |
| निस्सरण | discharge | [ कलम ३ (२) (चार) ] |
| परिवहन | transportation | [ कलम २ (घ) ] |
| पात्र | liable | [ कलम १७ (१) ] |
| पुरस्कार करणे | sponsoring | [ कलम ३ (२) (नऊ) ] |
| प्रत्यायोजन | delegation | [ कलम २३ ] |
| प्रदूषक | pollutant | [ कलम (२) (ख) ] |
| प्रभारी | in charge | [ कलम ११ (३) ] |
| प्राधिकारपत्र | authorisation | [ कलम १० (१) (ख) ] |
| फेरबदल | modification | [ कलम २३ ] |
| बांधील | bound | [ कलम २५ (२) (ग) ] |
| भोगवटादार | occupier | [ कलम २ (च) ] |
| मूकानुमती | connivance | [ कलम १६ (१) ] |
| मुद्रांकित करणे | to seal | [ कलम ११ (४) (ख) ] |
| राष्ट्रव्यापी | nation-wide | [ कलम ३ (२) ] |
| विवरण | return | [ कलम २० ] |
| विश्लेषण | analysis | [ कलम २१ ] |
| विसर्जन | discharge | [ कलम २५ (२) (क) ] |

| | | |
|---|---|---|
| वस्तुस्थिती | fact | [ कलम २५ (२) (ग) ] |
| शाबीत करणे | to prove | [ कलम १६ (२) ] |
| शून्यीकरण | annulment | [ कलम २६ ] |
| सद्‌भावपूर्वक | in good faith | [ कलम १८ ] |
| समयोचित | expedient | [ कलम १२ (२) (ग) ] |
| सुधारात्मक उपाययोजना | remedial measures | [ कलम ३ (२) (सहा) ] |
| सूक्ष्मजीव | micro-organisms | [ कलम २ (क) ] |
| सौम्य करणे | mitigate | [ कलम ९ (१) ] |
| संरक्षण तरतुदी | safe guards | [ कलम ३ (१) (सहा) ] |
| संहति | concentration | [ कलम ६ (२) (ख) ] |
| संहिता | code | [ कलम ३ (२) (तेरा) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई